# निशाणी क्र. १९८ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १७ यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करून वारस दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. १७ गोविंद उर्फ बाबा नारायण धुवाळी हे दि. २७/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. मात्र मार्च २०२० पासून कोव्हीड १९ या माहामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन झाल्यामुळे तसेच सदर कालावधीत दिवाणी कामकाज बंद असल्यामुळे तसेच दिवाणी कोर्टामध्ये अर्जंट दादींकरीता कोर्ट काम चालू असल्यामुळे पक्षकार कोर्टात हजर राहू शकत नव्हते. तसेच, या कामातील वादी हे सुमारे ७० वर्षाचे वयोवृध्द इसम आहेत वर नमुद प्रतिवादी क्र. १७ चे वारस रेकॉर्डवर आणण्यास ३ महिने १४ दिवस इतका विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा जाणुन बुजून झालेला नाही. सबब सदरचा विलंब माफ करुन प्रस्तूत प्रतिवादी चे वारस रेकॉर्डवर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. १७ हे दि. २७/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा

दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर विलंब माफ करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )

दिनांक: १७/११/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.